सीएनआरएमएचएनबी–०९.०००४८०.२०२३
फौ. कि. अर्ज क्रमांक १५०/२०२३
नि.क्रं. ५ खाली

**निशाणी क्रमांकः ५ खाली आदेश**
(पारीत दिं. ३०.०४.२०२४)

प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अंतर्गत तात्पुरती अंतरीम खावटी मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२) अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे दि. २१.०५.२००९ रोजी अर्जदार व सामनेवाला क्रं. १ यांचे लग्न हिंदु धर्मशास्त्र व जातिरिवाजाप्रमाणे रोजी झाले असून उभयंतात पती–पत्नीचे नाते कायम आहे. लग्नानंतर अर्जदार हि सामनेवाला क्रं १ सोबत आश्रावा ता. कुकरमुंडा जि. तापी येथे नांदावयास गेली. सुरुवातीस सामनेवाला यांनी अर्जदार हिस चांगले नांदविले. परंतु काही काळानंतर सामनेवाला हे अर्जदार क्रं. १ यांना लहानसहान कारणांवरुन त्रास देण्यास सुरुवात केली. दरम्यान अर्जदार क्रं. २ अनुश्री हिचा जन्म दि. २०.०५.२०१२ रोजी झाला. सामनेवाला यास पहिला मुलगा हवा असल्याने मुलगी झाल्यावर ते अर्जदारास गांजपाट करीत होते. तसेच मुलगी झाल्याचे दुःख झाल्याने सामनेवाला क्रं. १ ने दारु पिण्याचे व्यसन लावून घेतले. यामुळे दररोज दारुच्या नशेत येवून सामनेवाला क्रं. १ हा अर्जदार क्रं. १ हिस मारझोड करीत असे. सामनेवाला क्रं. २ हि देखील मुलगा न झाल्यामुळे अर्जदार क्रं. १ हिला शिवीगाळ करीत असे. तसेच अर्जदार हिस सामनेवाला हे रात्री–अपरात्री लहान मुलगीसह बाहेर काढून देत असल्यामुळे अर्जदार क्रं. १ ही मुलीसह रात्रभर बंद दरवाजा बाहेर बसून रात्र काढत असे. तरिही अर्जदार ही सामनेवाला क्रं. १ व २ यांचा त्रास सहन करीत सासरी राहत होती. त्रास कमी व्हावा म्हणून अर्जदार हिने सामनेवाला क्रं. ३ ते ७ यांना आश्रावा येथे बोलविले असता त्यांनी देखिल अर्जदार हिला घरातून हाकलून देण्याची भाषा केली होती. २०१९ मध्ये रात्री अर्जदार जेवन करीत

असतांना सामनेवाला क्रं. १ याने दारुच्या नशेत येवून *'तुझे लग्नापुर्वी व यानंतर हि पर पुरुषांशी संबंध होते व आहेत, अशी सर्व माहिती मला मिळाली आहे'* असे म्हणुन तिला भरल्या ताटावरुन उठवून मारठोक केली; तसेच अर्जदार क्रं. १ यांच्या अंगावरील सोन्याचे दागिणे, मंगळसुत्र, सोन्याचा बांगड्या, डोरले, पांचाली काढून सामनेवानला यांनी अर्जदार क्रं. १ हिला शिवीगाळ करीत मुलीसह रात्री ११.०० वाजता घराच्या बाहेर काढून दिले. अर्जदार हि आश्रावा ते तळोदा ४ कि.मी. अंतर पायी चालत तळोदा येथे राहणारी तिची बाल मैत्रिणीचा घरी रात्रभर थांबली होती. सामनेवाला यांनी अर्जदार हिचा इकडे तिकडे तपास न करता अर्जदार क्रं. १ च्या आई वडीलांकडे जावून *'तुझी मुलगी कुणा तरी इसमा सोबत पळून गेली आहे'* असे सांगून त्यांना शिवीगाळ केली.

३) अर्जदार हिच्या आई वडीलांची परिस्थीती अत्यंत गरीबीची व हलाखीची असल्याने तसेच अर्जदार क्रं. १ हिचा सख्खा भाऊ हा त्याच्या पत्नीसह वेगळा रहात असल्यामुळे अर्जदार हे त्यांच्या माहेरी देखील राहू शकत नव्हती. म्हणुन अर्जदार हि आई वडीलांची परिस्थीतीकडे पाहून तळोदा येथील मिरा कॉलनी, प्रताप नगर, गोपाळ नगर, अशा ठिकाणी झाडू–पोंछा, धुणी–भांडी करण्याचे काम करित होती. दि. २२.०५.२०२२ रोजी अर्जदार ही राहत असलेल्या ठिकाणी सामनेवाला क्रं. १ ते ७ यांनी येउन अर्जदाराला शिवीगाळ करीत सा.क्रं. ७ याने हातातील मजकूर लिहिलेल्या स्टॅम्पवर सही करण्याचे सांगितले. अर्जदार क्रं. १ हिने सही करण्यास नकार दिल्याने सामनेवाला क्रं २ ते ४ व ६ यांनी अर्जदाराच्या डोक्याचे केस धरुन तिला खेचत अंगणात आणून लाथा बुक्यांनी मारहाण केली. शेजारी राहणारे आनंदा मराठे व राधाबाई मराठे यांनी तीचा सोडवणुक केली. सामनेवाला क्रं. १ व २ यांनी मिळून अर्जदार क्रं. १ हिस तिचा मुलीसह घरातून हाकलून दिले. तसेच सामनेवाला क्रं. ३ ते ७ हे त्यांचे जवळचे नातलग असल्याने त्यांनी मिळून अर्जदाराचा मानसिक व शारिरीक छळ केला.

४) अर्जदारास उत्पनाचे साधन नसून निवारा नाही. याउलट सामनेवाला यांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून त्यांची स्वतःची तथा भाडे पट्टाची अशी एकुण ५० एकर बागायत शेती आहे. तसेच सामनेवाला क्रं. २ हिचा नावावर हि वेगळी शेती असून सामनेवाला क्रं. ३ ते ७ हे शेती व्यतिरीक्त इतर व्यवसाय करतात. सामनेवाला हे शेती कसणारी गुजर जमीनदार पैकी असल्याने ते त्यांचा पंच क्रोशित सावकार म्हणून ओळखले जातात. सामनेवाला क्रं १ ते ७ हे अर्जदारास व तिचा मुलीस त्रास देण्यास सामूहिक जबाबदार असून त्यांना खावटी देण्यास समर्थ आहेत. अर्जदार क्रं. २ हि शिक्षण घेत आहे. तसेच अर्जदार व तिचा मुलीस भरण पोषण व निवाराची अडचण आहे. सामनेवाल्याने हाकलून लावल्यापासून अर्जदारांची अन्न, वस्त्र व निवारा तसेच औषधोपचाराची कोणतीही तरतुद अथवा सोय केली नाही. म्हणून अर्जदारांनी निकाल लागेपावेतो तात्पुरती मासीक अंतरीम खावटी मिळण्यासाठी सदरचा अर्ज केला आहे.

५) प्रस्तुत प्रकरणांत सामनेवाला क्र. १ ते ७ यांनी त्यांच्या मुळ अर्जास लेखी जबाब दाखल केलेला नाही तथापी सदर अर्जास त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. सामनेवाला यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार ही नामांकीत शाळेत नोकरीस असुन तिला उत्पनाचे साधन आहे त्यामुळे ती अंतरिम खावटी मिळण्यास पात्र नाही. तसेच अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज हा मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशाप्रमाणे विहीत नमुन्यात दाखल केला नसल्यामुळे तो खारीज करण्याची विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

६) अर्ज व त्यावरील अर्जाचे उत्तर आणि दोन्ही पक्षाचे विद्वान वकिलांचा सुनावणी ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष खालील कारणेमिमांसेच्या आधारे देत आहे.

| अ.क्रं. | मुददे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १ | अर्जदार क्रं.१ व २ हे अंतरीम मासीक खावटी मिळण्यास हक्कदार आहेत काय? | अंशतः होय |
| २ | आदेश काय ? | ..... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

७) अर्जदार क्रं. १ यांनी त्यांच्या सदर अर्जाच्या समर्थनार्थ नि.क्रं. १७ नुसार दस्ताऐवज दाखल केले आहे. याउलट सामनेवाला यांनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ एकही दस्त दाखल केलेला नाही.

**मुद्दा क्रं. १ करिताः–**

८) अर्जदार आणि सामनेवाला यांच्यातील नातेसंबंध विवादीत नाहीत. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सामनेवाला यांचे उत्पन्नाबाबत प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने सामनेवाला यांच्याकडे असलेली बागायती शेती बाबत ७/१२ उतारे व घराचा उतारा दाखल केले आहेत. सदर उता–यांचे अवलोकन केले असता मौजे गोरासा ता. कुकरमुंडा जि. तापी येथील सर्व्हे क्रं. ९ पैकी १ हि सामाईकपणे ताराबेन, पंकजलाल, सरलाबेन आणि वैशालीबेन यांच्या नावे असल्याचे दिसून येते. मौजे गोरासा ता. कुकरमुंडा जि. तापी येथील सर्व्हे क्रं. ९ पैकी ४ हि सामाईकपणे ताराबेन, पंकजलाल, सरलाबेन आणि वैशालीबेन यांच्या नावे असल्याचे दिसून येते. मौजे गोरासा ता. कुकरमुंडा ता. तापी येथील घर मिळकत क्रं. ७९५ च्या गाव नमुना नं. ८–अ चे अवलोकन केले असता सदरची घर मिळकत ही पंढरीनाथ पटेल यांच्या नावे असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदारातर्फे दाखल केलेल्या घराचा उतारा पाहता आजरोजी सामनेवाला यांच्याकडे राहावयास घर आहे हे स्पष्ट होते. तसेच सामनेवाला यांच्याकडे असलेली शेती हि सामाईक स्वरुपाची असली तरी सामनेवाला यांचे उत्पन्नाचे साधन असल्याचे स्पष्ट दिसून येते.

९) आज रोजी अर्जदार हि तिच्या मुलीसोबत एकटी राहत असल्याची बाब दिसुन येते. सामनेवाला यांनी सदर बाबी स्पष्टपणे नाकारलेल्या नाहीत; त्यामुळे अर्जदारांनी केलेल्या कथनांना वजन प्राप्त होवुन त्या एकमेव ठरतात. याचाच अर्थ अर्जदार सासरी नांदत असतांना सामनेवाला क्र.१ ते ७ यांनी प्रथमदर्शनी तिचा कौटुंबिक शारीरीक, आर्थिक आणि मानसिक छळ केल्यामुळे ती तिच्या मुलीसह वेगळी राहत असल्याची शक्यता या ठिकाणी नाकारता येत नाही. जरी अर्जदार हिने तिचा शपथपत्रात ती रोजंदारीने शिक्षण स्वंस्थेत लहान विद्यार्थ्यांचा सांभाळ करण्यासाठी जात असल्याची बाब मान्य केली असली; तरीही आजरोजी अर्जदार क्रं. २ ही ११ वर्ष वयाची असुन ती शिकत असल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत आजची परिस्थिती पाहता अर्जदार ही स्वतःचे व तिच्या मुलीचे पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते.

१०) अर्जदार ही सामनेवाला क्रं. १ यांची पत्नी असून ती सन २०१९ पासून अर्जदार क्र. ०२ यांचेसह सामनेवाला यांच्यापासून विभक्त राहते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये एखादी व्यक्ती पुरेसे उत्पन्नाचे साधन असुन सुध्दा पत्नी व मुलांकडे दुर्लक्ष करीत असेल किंवा त्यांचे पालनपोषण करण्यास नाकारत असेल तर मासीक खावटी मंजूर करण्याची तरतुद आहे. तसेच कलम २३ प्रमाणे अंतिम खावटीकरीता प्रकरण प्रलंबित असतांना तात्पुरती मासीक अंतरीम खावटी मंजूर करता येते. अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांवर केलेले आरोप प्रकरणात पुरावा आल्यानंतर विचारात घेतले जातील; परंतू प्रकरणाच्या या स्तरावर अर्जदारांना तात्पुरती अंतरीम मासीक खावटी मंजूर होणे आवश्यक आहे.

११) अर्जदार यांनी सामनेवाल्याचे मासीक उत्पन्नावरुन ३०,०००/– मासीक अंतरीम खावटी मंजूर करण्यास विनंती केली परंतू सामनेवाला यांच्या उत्पन्नाबाबत सबळ पुरावा अभिलेखावर येणे बाकी आहे म्हणून तात्पूरत्या स्वरुपात सामनेवालाने यांनी अर्जदार

क्रं. १ यांना मासीक अंतरीम खावटी रु. २,०००/- तर अर्जदार क्रं. २ यांना शिक्षण आणि औषधोपचाराकरीता तात्पुरती अंतरीम खावटी रु. २,०००/ प्रतिमहिना अर्ज दाखल तारखेपासून देणे न्यायोचित ठरते. आज रोजी अर्जदार क्रं. १ व २ यांना निवासाकरिता भाड्याची सोय नाही याबाबत अर्जदाराने काहीही कथन केलेले नाही म्हणून वरील संपुर्ण कारणेमिमांसेच्या अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज हा अंशतः मंजूर करणे न्यायोचित ठरते म्हणून मुद्दा क्रं. १ यास होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्रं. २ च्या अनुशांगाने खालील आदेश पारीत करित आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांनी अर्जदार क्रं. १ यांना रुपये २०००/- व अर्जदार क्रं. २ हिस रु. २०००/- असे एकुण ४०००/- (रुपये चार हजार पाचशे फक्त ) असे प्रति महिना तात्पुरती खावटी अर्ज दाखल तारखेपासून ते मुख्य अर्जावर निर्णय लागेस्तोवर द्यावे.

३. आदेशाची प्रत दोन्ही पक्षास मोफत द्यावी.

४. आदेशाची प्रत संबंधीत पोलीस स्टेशन आणि संरक्षण अधिकारी तळोदा, यांना पाठविण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

SUVIDHA GAJANAN PANDE

Digitally signed by SUVIDHA GAJANAN PANDE
Date: 2024.04.30 16:03:04 +0530

(सुविधा ग. पांडे / यावलकर)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी तळोदा
ता. तळोदा जि. नंदुरबार

तळोदा
दिनांकः३०.०४.२०२४